# नवीन शैक्षणिक धोरणातील उच्च शिक्षणाविषयक दृष्टीकोन

**प्रा. प्रगती हरले कुकडे**
समाजशास्त्र विभाग,
कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर
prgtkukade12@gmail.com

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने व्यावसायिक अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणात मुख्य प्रवाहातील अकॅडमिक विषयांइतके महत्व देण्याचा निर्णय आलेला आहे. जागतिक पातळीवरील विद्यापीठाच्या क्रमवारीत भारतातील विद्यापीठे झळकावीत या दृष्टीने नवीन शैक्षणिक व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्राधान्य देतांना तशा स्वरूपाची साधनसामुग्री उपलब्ध असणे तसेच प्रशिक्षित प्राध्यापक वर्ग उपलब्ध असणे देखील गरजेचे आहे. उच्च शिक्षणाबाबत देशाच्या विभिन्न भागातील गरजा पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय संस्कृती व परंपरांचे जतन व संवर्धन करण्यासाठी उच्च शिक्षणाची म्हणजे विद्यापीठीय शिक्षणाची पूनर्रचना करणे आवश्यक आहे. शैक्षणिक सोयी— सवलती विशेषत: ग्रामीण भागात आणि नव्याने स्थापन झालेल्या महाविद्यालयांमध्ये निर्माण झालेल्या विशेषत: ग्रामीण भागात नव्याने प्रारंभ झालेल्या महाविद्यालयातील वाचनालयाच्या, महाविद्यालयाच्या, वसतिगृहाच्या इमारती सुसज्ज करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सहकार्य करणे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणाचा विस्तार करताना शासनाने वैद्यकीय महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, दुग्ध व्यवसाय, कृषी, नर्सिंग यासारख्या विविध व्यवसायांचे शिक्षण—प्रशिक्षण देण्यासाठी महाविद्यालये निर्माण करणे अपेक्षित आहे.

**Key Words :** शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम व साधनसामुग्री, शासनाचा हस्तक्षेप, विद्यापीठाची भूमिका, तंत्रज्ञानाचा वापर

**उद्देश:—**

१. नवीन शैक्षणिक धोरणातून श्रमप्रतिष्ठा वाढविण्याकरिता मदत होईल याची शहानिशा करणे.
२. नवीन शैक्षणिक धोरणात शासनाच्या भूमिकेची चर्चा करणे.

शिक्षण म्हणजे बदल किंवा विकास होय. व्यक्तीच्या जन्मजात सुप्तगुणांना जागृत करणे म्हणजे शिक्षण. त्यांचा आविष्कार करणे, विकास करणे म्हणजे शिक्षण. म्हणजेच व्यक्तींमध्ये असलेल्या जन्मजात शक्तीवर त्यांचा विकास अवलंबून असतो. परंतु सामाजिक संस्थांमधून व्यक्तीचे व्यक्तिमत्व विकसित होत असते. सामाजिक परिस्थितीत तसेच व्यक्तीच्या वर्तनात शिक्षणाच्या माध्यमातून बदल होतो.

भारतीय संविधानातील राज्यसूचीत शिक्षण या विषयाचा समावेश आहे. राज्यसूचीत समाविष्ट असणाऱ्या विषयासाठीच्या खर्चाचा सर्व भार राज्य सरकारला सहन करावा लागतो. म्हणजे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा विस्तार व विकासासाठीच्या संपूर्ण खर्चाची तरतूद राज्य सरकारला आपल्या उत्पन्नामधून करावी लागते. केंद्र सरकारच्या तुलनेत राज्य शासनाची उत्पन्नाची साधने अत्यंत मर्यादित आहेत. यामुळे राज्य शासनाला सामाजिक— आर्थिक विकासाच्या योजना राबविण्यात केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यावर अवलंबून रहावे लागते. देशाचा खरा विकास त्या देशाच्या उच्चशिक्षणावर अवलंबून असतो आणि त्यानुसार प्रगती ही होत असते. उच्च शिक्षण हे काम निर्माण

करणारे, हात निर्माण करणारे झाले पाहिजे. ज्यातून समाज, राष्ट्र यांची उन्नती झाली पाहिजे. ज्ञानवान समाजाची आवश्यकता ही राष्ट्राच्या एकूण गरजातील प्रथम गरज आहे. शिक्षण आणि समाज एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. म्हणून शिक्षण हे समाजाच्या विविध गरजा पूर्ण करणारे असायला पाहिजे. येणारी पिढी आत्मनिर्भर भारतासाठी, नव निर्माणासाठी सज्ज होण्याच्या दिशेने शैक्षणिक धोरणांमध्ये नवनवीन पाऊल उचलणे गरजेचे आहे. या संदर्भात नवीन शैक्षणिक धोरणाची चर्चा करणे गरजेचे ठरते. स्वातंत्र्योत्तर काळापासून अनेक शैक्षणिक धोरण अवलंबिली गेली. त्यातील कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार शिक्षणपद्धतीत आमुलाग्र बदल झाले. व्यवसाय, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञानावर भर देण्यात आला. १०+२+३ हा शैक्षणिक आकृतीबंध बऱ्याच राज्यात आजही सुरू आहे. १९६६ मध्ये कोठारी आयोगाने शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान ६ टक्के खर्च व्हावा, अशी शिफारस केली होती. परंतु त्यांची अंमलबजावणी अद्याप होऊ शकली नाही. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावर ६ टक्के खर्च व्हावा असे म्हटले आहे. नवीन शैक्षणिक धोरणात ३ + २ म्हणजे ३ वर्षाचे पदवीचे शिक्षण आणि दोन वर्षाचे पदव्युत्तर शिक्षण तर ४ + १ म्हणजे ४ वर्षाचे पदवीचे शिक्षण आणि १ वर्षाचे पदव्युत्तर शिक्षण. यात एक नवीन संकल्पना आणण्यात आली आहे. पदवीचा अभ्यासक्रमपूर्ण करतांना 'आगमन' व 'बहिर्गमन' कोणत्याही टप्प्यावर करता येईल. तसेच कोणताही अभ्यासक्रम सोडूनवेगळा अभ्यासक्रम घेता येईल. यासाठी पहिल्या वर्षानंतर प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षानंतर पदविका व तिसऱ्या वर्षानंतर पदवी प्रदान करण्यात येईल. ही लवचिकता विद्यार्थ्यांच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे.

**व्यावसायिक अभ्यासक्रम व साधनसामग्री :—**

व्यावसायिक अभ्यासक्रमांना उच्च शिक्षणात मुख्य प्रवाहातील अकॅडमिक विषयांइतके महत्व देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. अशाप्रकारचे प्रयत्न यापूर्वीही झालेले आहेत. परंतु अशा प्रयत्नांना पुरेसे यश मिळालेले नाही. कारण व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आवश्यक ती साधनसामग्री, शिक्षित प्रशिक्षक वर्ग इ. साठी भरपूर आर्थिक पाठबळ लागते. सुरूवातीला अशा अभ्यासक्रमांना केंद्र शासन पहिली पाच वर्षे अनुदान देते व नंतर राज्य शासन मात्र ही जबाबदारी घ्यायला तयार होत नाही. तसेच आपल्या समाजाची श्रमप्रतिष्ठेविरूद्ध असणारी मानसिकता आड येते. पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र पात्र केलेल्यांना नोकरी व्यवसायाच्या समान संधी नसतात. तसेच समाजही त्यांच्याकडे सम्यक दृष्टीने पाहत नाही. कारण श्रमाची कामे करण्याची लाज वाटणाऱ्या समाजाला बदलणे सोपे नाही.

**विद्यापीठाची भूमिका :—**

परदेशातील विद्यापीठे आणि आपल्या भारतीय विद्यापीठांमध्ये गुणात्मक तसेच संख्यात्मक फरक असलेला दिसून येतो. परदेशातील बहुतेक सर्वच विद्यापीठे १०—१५ संलग्न महाविद्यालये आणि ५—१० पदव्युत्तर विभाग एवढीच मर्यादित असतात. या उलट भारतातील प्रमुख विद्यापीठे म्हणजे किमान पाच— सातशे संलग्न महाविद्यालये व पाच—पन्नास पदव्युत्तर विभाग एवढी मोठी असतात. तसेच जागतिक स्तरावर विद्यापीठांची क्रमवारी निश्चित करताना एकूण विद्यार्थी संख्या, स्त्री पुरूष गुणोत्तर, शिक्षक विद्यार्थी गुणोत्तर इ. आधारावर केली जाते. या सर्वांचा विचार करता भारतातील विद्यापीठांची अवस्था लक्षात येते. परदेशातील विद्यापीठांमध्ये विपूल साधन सामग्री, प्रदीर्घ परंपरा, शिक्षण व संशोधन याकडे बघण्याचा प्रगल्भ व निकोप दृष्टीकोन, आर्थिक व नैतिक स्वायत्तता, गुणवत्तेला दिले जाणारे महत्व अशी व्यवस्था

असल्याचे दिसून येते. याउलट भारतीय विद्यापीठांमध्ये साधन—सुविधांचा अभाव, संशोधनाचा घसरतादर्जा, प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबतची शासनाची अनास्था इ. अनेक समस्या आढळून येतात.

**शासनाचा हस्तक्षेप :—**

शिक्षणात शासनसंस्थेने ढवळाढवळ करू नये असे शिक्षणवेत्ते मानतात. जो पक्षसत्तेवर असेल तो आपल्या पक्षाच्या धोरणानुसार शिक्षणाला वळण देतो. त्यानुसार शैक्षणिक ध्येये ठरवितात. एकंदरित शैक्षणिक क्षेत्रात राजकीय प्रभाव दिसून येतो. शिक्षणावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण असल्याने अभ्यासक्रम तयार करण्याचे कार्य सरकारद्वारे केले जाते. अभ्यासक्रमांची रचना करताना व्यक्तिविकासापेक्षा राज्य विकासाला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे राज्यकर्त्यांना जे महत्वाचे विषय वाटतात त्यांचा समावेश अभ्यासक्रमात केला जातो. तसेच शैक्षणिक धोरण ठरवितांनाही त्याच प्रकारची धोरणे ठरविली जातात. परिणामी प्रत्येक वेळेस त्यासंबंधित संस्थेकडून किंवा समितीकडून शिक्षणविषयक निर्णय घेतले जातीलच असे नाही. बऱ्याचदा एखाद्या विशिष्ट राजकीय तत्वप्रणालीचा त्यावर प्रभाव असल्याचे जाणवते.

**तंत्रज्ञानाचा वापर :—**

शिक्षणामध्ये जी विविध साधने वापरली जातात व ज्या साधनांद्वारा अध्ययन, अध्यापन किंवा प्रशिक्षणात सुधारणा केली जाते. त्यासाधनांच्या अभ्यासाला शिक्षणातील तंत्रज्ञान असे म्हटले जाते. उदा. रेडिओ, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन, चित्रपट किंवा विविध प्रकारचे प्रक्षेपिक तंत्रज्ञान होय. बऱ्याच वेळेला अभ्यासात यालाच शैक्षणिक तंत्रज्ञान असे समजतात. परंतु ते असे नाही. शिक्षणशास्त्रातील विविध तत्वे, सिद्धांत, सूत्रे, उपपत्ती, उत्पत्ती यांचा वापर करून शिक्षण क्षेत्रातील अध्ययन, अध्यापनातील समस्या सोडविल्या जातात. काही वेळेला शिक्षणा संबंधीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने किंवा विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने किंवा शिक्षणातील क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने विविध तंत्रांचा, सूत्रांचा, पद्धतींचा वापर केला जातो. त्या नियमांच्या अभ्यासाला शिक्षणाचे तंत्रज्ञान असे म्हणतात.

मानवी अध्ययन, अध्यापन व प्रशिक्षण यामध्ये सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने नवनवीन तंत्राचा, पद्धतींचा व साधनांचा वापर, विकास व त्यांचे मूल्यमापन शैक्षणिक तंत्रज्ञानांमध्ये अभिप्रेत असते. एकविसाव्या शतकात ज्ञानाचा प्रस्फोट झालेला आहे. म्हणून समाजपरिवर्तनही जलद गतीने होते. शिक्षण पद्धतीमध्ये क्रांतीकारक बदल घडणे आवश्यक असल्याने केवळ ज्ञान संक्रमण करणे किंवा परिपूर्ण व्यक्ती तयार करणे एवढेच शिक्षणाचे उद्देश नसून जिज्ञासा जागृत करण्याचे व अभिरूचीवृत्ती आणि मूल्य स्वीकृती वाढविणे, स्वतंत्रपणे अभ्यास करणे, विचार करणे आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढविली पाहिजे. आधुनिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या समाजाने स्वत:ला सुशिक्षित केले पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांच्या शिक्षणाची पातळी उंचावली पाहिजे. त्याचबरोबर आवश्यक गुणवत्ता असलेला बुद्धीमान वर्ग निर्माण केला पाहिजे. तसेच शिक्षणात जर राजकीय हस्तक्षेप असेल तर तो शैक्षणिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीने असला पाहिजे. त्यानुसार शिक्षण क्षेत्रात सुधारित बदल घडवून आणला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ —**

१. अहिरे पी.ए., (२०११), 'शिक्षणाचे अधिष्ठान', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.
२. पाटील दीपक, विंजारी साजीद, माळी नामदेव पाटील, शशिकांत, (२०१४), 'समकालीन भारतातील शिक्षण', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.

३. लोटे रा.ज. (२०१५), 'भारतीय समाज आव्हाने आणि समस्या', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
४. महाराष्ट्र टाईम्स, ९ ऑगस्ट २०२०.
५. साधना, १० ऑक्टोबर, २०२०.
६. क्रमिक पुस्तक, पुणे विद्यापीठ, (२०१६), 'शिक्षणाचे समाजशास्त्र', सक्सेस पब्लिकेशन्स.